महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९७ वे | दिनांक : ११/०७/२०२६ | वार : शनिवार

## फडणवीस सरकारचा मोठा निर्णय; ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी



**मुंबई** : राज्यातील बळीराजा साठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक घोषणा केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजने'अंतर्गत शेतकऱ्यांना दिली जाणारी ५० हजार रुपये भरण्याची जाचक अट सरकारने पूर्णपणे काढून टाकली आहे. यामुळे राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी मिळणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विरोधकांकडून या कर्जमाफी योजनेवर होत असलेल्या टीकेला फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर दिले. "या योजनेमुळे केवळ ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल आणि १२-१३ हजार कोटींचाच लाभ मिळेल, हा दावा पूर्णपणे चुकीचा आहे. राष्ट्रीयकृत, व्यापारी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून गोळा केलेल्या अचूक डेटानुसार, ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळवून देणारी ऐतिहासिक योजना आहे," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

कर्जमाफीबाबत अभ्यास करण्यासाठी सरकारने 'प्रवीण परदेशी समिती' स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी दिल्यास शेतकरी कर्ज भरणे थांबवतील आणि बँकिंग व्यवस्था कोलमडेल, अशी भीती या समितीने व्यक्त केली होती. त्यामुळे मागील योजनेत लाभ घेतलेल्यांना पुन्हा कर्जमाफी देताना काही रक्कम (उदा. ५० हजार) भरण्याची अट सुचवली होती. मात्र, महायुतीच्या सर्व आमदारांनी ही ५० हजारांची अट रद्द करण्याची जोरदार मागणी लावून धरली.

ही अट काढल्यास तिजोरीवर ३ ते ४ हजार कोटींचा अतिरिक्त भुर्दंड पडेल आणि दोन लाख शेतकरी लाभापासून वंचित राहतील, हे माहीत असूनही व्यापक हिताचा विचार करून सरकारने ही अट मागे घेण्याचा निर्णय घेतला. तसेच, जुन्या (२६-२७) अटीही वगळण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

आधीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'तील त्रुटी दूर करून सरकारने ही नवी योजना अधिक लवचिक बनवली आहे. आधीच्या योजनेत शेतकऱ्याची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा केवळ १ रुपया जरी जास्त असली, तरी त्याला कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता. मात्र, अहिल्यादेवी होळकर योजना या नव्या योजनेत ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच, महात्मा फुले योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांनाही या नव्या योजनेत सामावून घेतले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कर्जमाफीमागची सरकारची भूमिका स्पष्ट करताना फडणवीस म्हणाले, "कोणत्याही कर्जमाफीने शेतकरी कधीही श्रीमंत होऊ शकत नाही, पण तो 'क्रेडिटवर्दी' (Creditworthy - कर्ज घेण्यास पात्र) नक्कीच होतो. शेतकऱ्याला पुन्हा खासगी सावकाराकडे जावे लागू नये, हेच या कर्जमाफीचे मुख्य उद्दिष्ट आहे."

"विधानसभा निवडणुकीच्या वेळी आम्ही कर्जमाफीचा शब्द दिला होता. सध्या आम्ही सर्व निवडणुका जिंकलो असल्याने हा निर्णय आम्ही २०२९ पर्यंतही लांबवू शकलो असतो. पण, जेव्हा शेतकरी अडचणीत असतो, तेव्हा त्याला तातडीने मदत मिळालीच पाहिजे, या भावनेतून आम्ही ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी जाहीर केली आहे," असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.शेती आणि नैसर्गिक संकटे यांचे नाते फार जुने आहे. अगदी राजे-महाराजांच्या काळातही तीन वर्षांतून एकदा तरी पीक हातचे जायचे, अशी नोंद इतिहासात आढळते. त्यावेळी संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर आधारित असल्याने राजे संकटाच्या काळात शेतसारा (कर) माफ करायचे. काही राजांनी तर शेतीचा विकास व्हावा म्हणून कर्ज पुरवल्याचेही दाखले आहेत. परंतु, ते तात्पुरते निर्णय होते.

सध्याही हवामान बदलाचे संकट आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेती व्यवसाय मोठ्या अडचणीत सापडला आहे. कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, यामुळे संपूर्ण हंगाम डोळ्यांदेखत वाया जातो. अशा बिकट परिस्थितीत शेतकरी दर एक-दोन वर्षांनी सरकारकडे कर्जमाफीची मागणी करत असतात. परंतु, स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वप्रथम शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा धाडसी निर्णय हरियाणा राज्याने घेतला होता.

स्वतंत्र भारतात पहिल्यांदा अधिकृतपणे कर्जमा
ची घोषणा 1987 मध्ये झाली. हरियाणात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकदल पक्षाचे नेते चौधरी देवीलाल यांनी शेतकऱ्यांना एक मोठे आश्वासन दिले. "निवडून आल्यास सहकारी बँकांकडून घेतलेले 10 हजार रुपयांपर्यंतचे शेती कर्ज माफ करू," अशी घोषणा त्यांनी केली. या आश्वासनाच्या जोरावर ते प्रचंड बहुमताने सत्तेवर आले आणि मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री झाल्यानंतर देवीलाल यांनी कर्जमाफीची फाईल पुढे सरकवली, पण त्यांच्यासमोर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (RBI) मोठे आव्हान उभे राहिले. तात्कालीन आरबीआय गव्हर्नर आर. एन. मल्होत्रा यांनी या निर्णयाला कडक विरोध केला. "राष्ट्रीयीकृत बँका आरबीआयच्या अंतर्गत येतात, त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री त्यांना आदेश देऊ शकत नाहीत," अशी भूमिका गव्हर्नर यांनी घेतली. मात्र, चौधरी देवीलाल यांनी या विरोधाला न जुमानता आपला निर्णय खंबीरपणे राबवून दाखवला.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना; ९ जणांची सुटका, एकाचा मृत्यू



**पुणे** : पिंपरी-चिंचवडमधील मोशी कचरा डेपोत झालेल्या भीषण दुर्घटनेला आता दोन दिवस उलटून गेले असून, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी अद्यापही युद्धपातळीवर मोहीम सुरू आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि अग्निशमन दलाच्या पथकाने आतापर्यंत 9 कर्मचाऱ्यांना कचऱ्याच्या ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले आहे. मात्र, या दुर्घटनेत एका कर्मचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, अजूनही 8 कर्मचारी कचऱ्याच्या महाकाय ढिगाऱ्याखाली दबले गेल्याची भीती आहे. दोन दिवस उलटूनही या 8 जणांचा कोणताही सुगावा न लागल्याने प्रशासनाची चिंता वाढली असून, बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांचा जीव टांगणीला लागला आहे.मोशी कचरा डेपोतील दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या आतील व्हिडिओ समोर आले आहे. व्हिडीओमध्ये इमारतीच्या आत दबलेले ऑफिसचे टेबल आणि काही विजेवर चालणारी उपकरणे स्पष्टपणे दिसत आहेत. दरम्यान, या ढिगाऱ्याखाली अद्यापही काही कामगार अडकले असून, बाहेर थांबलेल्या त्यांच्या कुटुंबीयांनी आता टाहो फोडला आहे. "बचाव पथकाने अत्यंत तत्परतेने आणि सुरक्षित मार्गाने बचावकार्य राबवून आमच्या माणसांना लवकरात लवकर बाहेर काढावे," अशी मागणी या पीडित कुटुंबीयांकडून प्रशासनाकडे केली जात आहे.

माहितीनुसार, मोशी कचरा डेपोमध्ये कचऱ्याचा भलामोठा डोंगर कोसळून झालेल्या या भीषण दुर्घटनेनंतर यंत्रणा सतर्क झाली आहे. काल दुपारपासून सुरू असलेले रेस्क्यू ऑपरेशन आज दुसऱ्या दिवशीही अखंडपणे सुरू आहे. कचऱ्याचा ढिगारा प्रचंड मोठा आणि खोल असल्याने शोधकार्यात बचाव पथकाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि श्वानपथकाच्या मदतीने ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

आतापर्यंत ढिगाऱ्याखालून 9 जणांना जिवंत बाहेर काढण्यात आले असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यापैकी एका कर्मचाऱ्याची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे मोशी परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.दुर्घटनेला दोन दिवस पूर्ण झाले तरी अद्याप 8 कर्मचाऱ्यांचा शोध लागलेला नाही. ढिगाऱ्याखाली जसजसा वेळ वाढत आहे, तसतशी काळजी अधिक गडद होत चालली आहे. कचरा डेपोच्या आवारात बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली असून, आपल्या माणसांच्या सुरक्षेसाठी त्यांचा आक्रोश सुरू आहे. प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जोपर्यंत शेवटचा व्यक्ती बाहेर निघत नाही, तोपर्यंत हे शोधकार्य थांबणार नाही.

पिंपरी-चिंचवडमधील मोशी कचरा डेपो दुर्घटनास्थळी आज सकाळी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी सुरू असलेल्या बचाव आणि मदतकार्याचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. दरम्यान, दुर्घटनाग्रस्त इमारतीभोवतालचा मलबा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, इमारतीचा अस्थिर भाग सुरक्षित करण्यासाठी यंत्रणांकडून वेगाने उपाययोजना करण्यात येत आहेत.

# महात्मा फुले महामंडळाच्या वर्धापनदिनी NSKFDC कर्जप्रकरणे मार्गी लावण्याची मागणी



**मुंबई :** महात्मा फुले आर्थिक मागासवर्गीय विकास महामंडळाच्या ४८ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब संभाजी पठारे यांनी आज पदभार स्वीकारलेले नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. रुचेश जयवंशी यांची सदिच्छा भेट घेऊन पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.यावेळी बाबासाहेब पठारे यांनी सन २०२२ मधील NSKFDC (National Scheduled Castes Finance and Development Corporation) योजनेअंतर्गत प्रलंबित कर्ज प्रकरणांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. महाराष्ट्रातील हजारो पात्र लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव मागील तीन वर्षांपासून विविध स्तरांवर प्रलंबित असून त्यामुळे युवक, महिला व होतकरू उद्योजकांना स्वावलंबनापासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.निवेदनात सर्व पात्र कर्ज प्रस्तावांची तातडीने छाननी करून मंजुरी देणे, मंजूर प्रकरणांचे त्वरित कर्ज वितरण (Disbursement) करणे, अनावश्यक विलंबाची चौकशी करून संबंधितांवर योग्य कारवाई करणे तसेच निश्चित कालमर्यादेत सर्व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची ठोस मागणी करण्यात आली.यावर मा. श्री. रुचेश जयवंशी यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत संबंधित प्रकरणांचा आढावा घेऊन नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीने मागासवर्गीय समाजातील पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा, रोजगारनिर्मितीला चालना मिळावी आणि शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी पुढेही सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शिक्षकांच्या हातात खडू अन् पुस्तक की प्रशासकीय फाईली?

आपल्या समाजात शिक्षकांना राष्ट्रनिर्माते आणि भावी पिढीचे शिल्पकार मानले जाते.परंतु,आजचा शिक्षक अध्यापनाच्या पवित्र आणि सर्जनशील कार्यात रमण्याऐवजी कागदपत्रांच्या जंजाळात आणि ऑनलाइन माहिती भरण्याच्या अशैक्षणिक कामांत पुरता होरपळून निघाला आहे.ही व्यथा केवळ शिक्षकांची नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची शोकांतिका आहे."शिक्षकांना शिक्षणाशिवाय इतर प्रशासकीय कामांच्या ओझ्यातून मुक्त केले,तर ते विद्यार्थ्यांच्या घडणीकडे अधिक लक्ष देऊ शकतील.शिक्षकांच्या हातात खडू आणि पुस्तक असावे; जनगणना,निवडणूक आणि सर्वेक्षणाच्या फाईली नव्हेत.तेव्हाच शिक्षणात खरी क्रांती घडू शकेल." हा विचार सद्यस्थितीचे विदारक वास्तव मांडणारा आहे.आज देशात कोणतीही जनगणना असो,निवडणूक असो की शासकीय सर्वेक्षण; प्रशासनाला नेहमीच 'शिक्षक' हा सर्वात हक्काचा आणि सोपा पर्याय वाटतो.जेव्हा शिक्षकांच्या खांद्यावर मतदार नोंदणी,आधार लिंकिंग आणि रोज नवनवीन ॲप्सवर माहिती अपलोड करण्याचे ओझे लादले जाते,तेव्हा त्यांच्या मनातील ज्ञानदानाची मूळ ऊर्जा आटून जाते.ज्या प्रगल्भ बुद्धीने नव्या पिढीला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नैतिक मूल्ये द्यायची,ती बुद्धी आज केवळ कारकुनी कामांच्या दबावाखाली गुदमरत आहे.सरकारी शाळांचा दर्जा सुधारायचा असेल,तर शिक्षकांना या अशैक्षणिक कामांच्या वाळवीतून मुक्त करणे गरजेचे आहे.जर आपल्याला देशात खरोखरच 'शैक्षणिक क्रांती' घडवून आणायची असेल,तर केवळ भव्य इमारती बांधून चालणार नाही.जोपर्यंत शिक्षकांच्या हातातून सर्वेक्षणाच्या जाडजूड फाईली काढून त्यांच्या हातात पुन्हा सन्मानाने 'खडू आणि पुस्तक' दिले जात नाही,तोपर्यंत शिक्षणाचा पाया मजबूत होऊ शकत नाही.शिक्षकांना केवळ आणि केवळ ज्ञानदानाचे त्यांचे मूळ कर्तव्य करू देणे,हीच आजच्या काळाची सर्वात मोठी हाक आहे.

**विजय म्हस्के पाटील**
**मो.न-९५९५४०११११**
**(छत्रपती संभाजीनगर शहर)**

# शिक्षण

शिक्षणाने येतो समजूतदारपणा,
शिक्षणानेच येतो शहाणपणा.
शिक्षणानेच येते जगण्याचे भान,
आणि बोलण्यातही येतो सन्मान.

शिक्षणाने होते बुद्धी तल्लख,
उजळतो जीवनाचा प्रत्येक पथ.
ज्ञानाच्या दीपाने अंधार सरतो,
माणूस खऱ्या अर्थाने घडत जातो.

शिक्षण देते जगण्याचे धडे,
शिक्षण करून देते तुमची ओळख खरे.
शिक्षणानेच कळतात संस्कार,
रीती-रिवाज आणि जीवनाचा आधार.

शिक्षणाचे ठिकाण नसते निश्चित,
ते मिळते प्रत्येक वाटेवर अखंड.
गल्ली-बोळात, वाडी-वस्तीत,
झोपडीतही आणि महालातही.

शिक्षणाने मिळते नवी दिशा,
शिक्षणाने फुलतात मनातील आशा.
शिक्षणाने वाढते आत्मविश्वासाची शान,
घडतो उज्ज्वल भारत, घडतो महान माणूस प्रत्येक जण.

म्हणून शिक्षणाचा धरूया ध्यास,
ज्ञानाचा पेटवूया प्रत्येक हृदयात प्रकाश.
शिक्षण हीच खरी संपत्ती,
तीच माणसाची सर्वात मोठी श्रीमंती.

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**




## काळवीट

सडपातळ बांध्याचा
काळवीट प्राणी
अधिवास त्याचा
हिरव्या गवताळ वनी

पाने आणि गवत
आवडते त्याला भारी
स्वभावाने शांत
शुद्ध शाकाहारी

तपकिरी पांढरा रंग
शिंगे पिळदार
संकटाच्या वेळी
शिंगाने करतो वार

चंचल टपोरे डोळे
सुंदर दिसतात खूप
रूबाबात चालताना
खुलून दिसते रूप

वाघ मागे लागता
वेगाने पळतो भारी
मागे वळून
पाहण्याची
सवय त्याची न्यारी



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## कवितेच्या प्रेमात

एक दिवस कवितेच्या प्रेमात,
चारोळी लिहिता लिहिता पडलो.
अंतर्मनातील भावना मांडतांना,
मनाच्या वेदना मांडून रडलो. १

शब्दांना धुमारे फुटले की,
कविता लिहायला लागतो.
कविता लिहिता लिहिता,
दररोज रात्र रात्रभर जागतो. २

कल्पना,भावना,प्रतिभा,
नेहमी सोबत मिळून येतात.
सोबतीने एकत्र येऊन माझं,
मन हलक करून जातात. ३

कवितेच्या प्रेमात पडले की,
मनातील दु:ख हलकं होतं.
जीवन जगतांना सदोदित,
लढण्याचे बळ देऊन जातं. ४

कवितेच्या प्रेमात पडल्यावर,
समाजातील सत्य मांडतो.
वास्तव सत्य मांडताना मात्र,
असत्याला वेशीवर टांगतो. ५



**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## मुख्य मार्गांवरील खड्ड्यांनी नागरिक हैराण; सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषदेच्या समन्वयाचा अभाव उघड



**जिंतूर (बि. डी. रामपूरकर) :** शहरात झालेल्या अल्पशा पावसानंतर शहरातील प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे, त्यामध्ये साचलेले पाणी आणि चिखलामुळे वाहनचालकांसह पादचारी व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.शहरातील येलदरी रोड, साखरतळा चौक ते संत भगवान बाबा चौक तसेच मध्यवर्ती मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.येलदरी रस्त्यावरील खड्डे तर हुतात्मा स्मारक परिसरातील रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने नागरिकांची गैरसोय अधिक वाढली आहे. येलदरी या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, व्यापारी, शालेय विद्यार्थी आणि रुग्णालयाकडे जाणारे रुग्ण प्रवास करतात. दुसरीकडे मात्र हुतात्मा रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.या भागातील अनेक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसाच्या पाण्यातून आणि चिखलातून वाट काढावी लागत आहे. शाळकरी मुलांना तसेच पालकांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून संबंधित विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र पहावयास मिळते.नागरिकांच्या मते, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद यांच्यातील समन्वयाचा अभाव हीच या परिस्थितीची प्रमुख कारणे आहेत. रस्त्यांचे खोदकाम झाल्यानंतर ते तातडीने दुरुस्त न केल्यामुळे समस्या अधिक गंभीर बनली आहे. काही ठिकाणी मोठे खड्डे तर दुसऱ्या बाजूला अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडीही नित्याची बाब झाली असून व्यापाऱ्यांनाही त्याचा आर्थिक फटका बसत आहे.चौकट हुतात्मा स्मारक परिसरातील रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून नागरिकांची अडचण दूर करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.नगराध्यक्ष प्रताप देशमुख मात्र प्रत्यक्षात कामाला अपेक्षित गती मिळणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.चौकटजिंतूरसारख्या वाढत्या शहरात दर्जेदार रस्ते ही मूलभूत गरज आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभाल होणे अपेक्षित असताना, आज नागरिकांना खड्डे, चिखल आणि वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्यांचे चित्र दिसून येते . प्रशासनाने जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून तातडीने रस्ते दुरुस्तीची कामे पूर्ण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच यंत्रणा जागी होईल का? अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

## श्रुती बाबासाहेब कांबळे हिचा समाज विकास संस्थेकडून सत्कार



**उमरगा (भूमिपुत्र वाघ) :** येथील समाज विकास संस्था आणि दान उत्सव समिती महाराष्ट्राचे मित्रगण यांनी श्रुती बाबासाहेब कांबळे हिचा ३५५१ रुपये आणि भूमिपुत्र वाघ यांची प्रकाशित झालेली पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉक्टर कल्पना निखिल वाघ, व्यंकट पोद्दार,संजय कोथळीकर सर,अनिता कुलकर्णी पुणे, इंजिनिअर मनोहर सूर्यवंशी, मुरजानी साहेब पूनम क्लोथ उमरगा, सुरेखाताई चौगुले- नारायणकर, रवींद्र पोतदार सर,यांच्या सहभागातून ३५५१रुपये बक्षीस देऊन श्रुती कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. डेहराडून या ठिकाणी झालेल्या आईस हॉकी नॅशनल लेव्हलवरच्या स्पर्धेमध्ये तिने विशेष प्राविण्य मिळवलं आहे. म्हणून समाज विकास संस्था मित्रपरिवार दान उत्सव समितीचे सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने तिच्या सत्काराचे आयोजन करण्यात आलं होतं. बाबासाहेब कांबळे हे पोलीस दलामध्ये उमरगा ब्रांचला रुजू आहेत स्वभावाने शांत, सय्यमी,मितवासी आशा या देवगुनी वडिलांच्या मार्गदर्शनाने श्रुतीने एवढ्या लहान वयामध्ये यशस्वीता गाठली म्हणून संस्थेच्या वतीने तिचे कौतुक केले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून किसन बाबरे इंजिनियर उमरगा रवींद्र पोतदार,यांना खास निमंत्रित करण्यात आले होते.या प्रमुख पाहुण्यांनी श्रुती कांबळे यांना शुभेच्छा दिल्या. तर आदर्श पालक म्हणून पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब कांबळे यांना भूमिपुत्र वाघ यांची प्रकाशित झालेली पुस्तके सप्रेम भेट देऊन त्यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन समाज विकास संस्थेच्या वतीने करण्यात आले होतं. कार्यक्रमाचे व्यवस्थापन अस्मिता सुरवसे यांनी केलं.तर आभार भूमिपुत्र वाघ यांनी मांनले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जुलै २०२६


## प्राचार्य राजाराम राठोड : पुरोगामी विचारांचा खंबीर आधारवड

वसंतराव नाईक महाविद्यालयात विद्यार्थी असताना विद्यार्थी संसद मंडळाच्या सचिवपदाच्या निवडणुकीत आमचे वर्गमित्र श्री. अजय देशमुख यांनी तत्कालीन परिस्थितीला आणि प्रस्थापित प्रवाहाला आव्हान देत निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत राहुल केंद्रे, कल्याण चोथे, डॅशिंग आणि खऱ्या अर्थाने राजकारणी मित्र गोपाळ माने तसेच प्रवीण पडुळ यांनी त्यांना खंबीर साथ दिली आणि अजय देशमुख यांना विजयी केले.यानंतर आमच्या आग्रहामुळे महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रखर विचारवंत मा. म. देशमुख यांनाच निमंत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या काळात महाविद्यालयीन परिसरात पुरोगामी विचारांना व्यासपीठ मिळावे, वैचारिक चळवळीतील अभ्यासक आणि विचारवंत विद्यार्थ्यांसमोर यावेत, असा सातत्याने आग्रह होत असे. इतिहासाचे नवे आकलन मांडणारे, अभ्यासू आणि प्रखर विचारवंत म्हणून मा. म. देशमुख यांचा महाराष्ट्रात उदय होत होता. अजय देशमुख यांनी बैठकीत त्यांचे नाव सुचवले आणि त्याला सर्वांची मान्यता मिळाली. निमंत्रणपत्रिका छापल्या गेल्या आणि त्यांचे वितरणही झाले.मात्र, निमंत्रणपत्रिकेवर मा. म. देशमुख यांचे नाव प्रसिद्ध झाल्यानंतर काही संघटनांकडून तीव्र विरोध सुरू झाला. महाविद्यालय जाळून टाकण्याच्या धमक्याही देण्यात आल्या. वातावरण अत्यंत तणावपूर्ण झाले. अशा वेळी अनेकजण माघार घेतले असते; परंतु संस्थाचालक, माजी प्राचार्य आणि धाडसी पुरोगामी विचारवंत प्राचार्य राजाराम राठोड खंबीरपणे विद्यार्थी, महाविद्यालय आणि तत्त्वांच्या पाठीशी उभे राहिले.त्यांचे एकच ठाम मत होते "काहीही झाले तरी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे मा. म. देशमुखच असतील." त्यांच्या या धाडसी आणि तत्त्वनिष्ठ भूमिकेमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैचारिक विविधता आणि पुरोगामी मूल्यांचे संरक्षण झाले. आज प्राचार्य राजाराम राठोड यांच्या निधनाची बातमी सोशल मीडियावर वाचली. मी जालन्यावरून साताऱ्याकडे निघालो होतो; मात्र काही कारणास्तव गाडी रद्द झाल्याने मला वसंतराव नाईक महाविद्यालयाजवळून जावे लागले. त्यांच्या निधनाची बातमी वाचल्यानंतर महाविद्यालयाजवळ पोहोचलो तेव्हा माझ्याकडे अवघी दहा मिनिटे होती. त्या अल्प वेळातही या धाडसी, पुरोगामी आणि बहुजनांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे अखेरचे दर्शन घेण्याचे भाग्य लाभले.तो प्रसंग आठवला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची पुन्हा जाणवली. त्या काळात मी त्यांचा विद्यार्थी होतो. विद्यार्थीदशेत त्यांच्या धाडसी, तत्त्वनिष्ठ आणि पुरोगामी भूमिकेचा प्रत्यक्ष साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले. ते केवळ कुशल प्रशासक नव्हते, तर पुरोगामी विचारांचे निर्भीड पुरस्कर्ते होते. तत्त्वांसाठी ठामपणे उभे राहण्याचे धैर्य, वैचारिक स्वातंत्र्यावरील अढळ निष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची वृत्ती आजही प्रेरणादायी आहे.प्राचार्य राजाराम राठोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली!त्यांच्या पुरोगामी विचारांचा आणि धैर्यशील वारशाचा प्रकाश पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहो.

**प्रा. अभय जायभाये सातारा**

## जेईएस महाविद्यालय जालना येथे ५ दिवशीय क्रीडा जनजागृती मोहीम



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे.ई.एस महाविद्यालय जालनाच्या क्रीडा विभागातर्फे ५दिवशीय क्रीडा जनजागृती मोहीम राबविण्यात आली असून यामध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडा प्रकाराचे गुण ओळखून आवडत्या क्रीडा प्रकार खेळाचे मार्गदर्शन केले जाते, याप्रसंगी प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री सर यांनी शहरातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील करिअर संदर्भात मार्गदर्शन केले क्रीडा संचालक प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांनी विविध क्रीडा प्रकार सांगून आवडत्या क्षेत्रात कसे प्राविण्य मिळवता येते या विषयाचे सविस्तर माहिती सांगितली. यावेळी उप प्राचार्य डॉ उमेश मोगले, क्रीडा विभागाचे डॉ.किशोर बिरकायलू प्रा. राहुल सारस्वत,राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे , प्रा.करण सातुरे, डॉ.यास्मिन शेख,तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.५ दिवसीय क्रीडा शिबिर यशस्वी होण्यासाठी श्री. विलास बोधले, श्री शामराव राठोड ,श्री घनश्याम मोदानी यांनी विशेष प्रयत्न केले

## सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा: इकरा पब्लिक स्कूलला जिल्हा पातळीवर कांस्य पदक!



**जळगाव** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, जळगाव अंतर्गत तसेच जळगाव जिल्हा फुटबॉल संघटना यांच्या सहकार्याने आयोजित प्रतिष्ठित 'सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत' इकरा पब्लिक हाय स्कूल अँड ज्युनियर कॉलेज (मोहाडी, जळगाव) च्या १५ वर्षांखालील मुलांच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हा पातळीवर कांस्य (ब्राँझ) पदक पटकावले आहे. या स्पर्धेचे आयोजन गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेज मैदान, भुसावळ रोड (खेडी, जळगाव) येथे १५ व १७ वर्षांखालील मुले आणि मुलींच्या वयोगटात करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय उर्वरित सामन्यांमध्ये इकरा स्कूलच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच मैदानावर आपला दबदबा निर्माण केला. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात इकरा पब्लिक स्कूलचा सामना बियानी मिलिटरी स्कूल (भुसावळ) सोबत झाला, ज्यामध्ये इकराच्या संघाने उत्कृष्ट चढाया आणि भक्कम बचावाच्या जोरावर बियानी मिलिटरी स्कूलचा ४ - ० अशा मोठ्या गोलफरकाने पराभव करत एकतर्फी विजय मिळवला. त्यानंतर अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या क्वार्टर फायनल (उपांत्य पूर्व) सामन्यात इकरा स्कूलने स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडियम स्कूल (अमळनेर) वर २ - १ अशी मात करत दिमाखात आगेकूच केली. तिसऱ्या सामन्यात इकरा पब्लिक स्कूल आणि सेंट अलॉयसिस (भुसावळ) यांच्यात अटीतटीची लढत झाली, ज्यामध्ये सेंट अलॉयसिस संघाने २ - ० ने विजय मिळवला. या संपूर्ण स्पर्धेत दाखवलेल्या उत्कृष्ट खेळाच्या आणि गुणांच्या जोरावर इकरा पब्लिक स्कूलने तृतीय क्रमांक पटकावून मानाचे कांस्य पदक आपल्या नावावर कोरले. इकरा पब्लिक स्कूलच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार, एजाज मलिक, पदाधिकारी, शाळेचे प्राचार्य शेख शकील, क्रीडा शिक्षक आमिर खान आणि पालकांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे सर्वत्र कौतुक होत आहे.


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जुलै २०२६


## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती समितीच्या अध्यक्षपदी गुज्जर



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** लहुजी शक्ती सेना आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची 106 वि सार्वजनिक जयंती महोत्सव समिती अध्यक्षपदी रमेश उर्फ गुज्जर मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर उपाध्यक्षपदी भारत आण्णा मोहिते सचिव गजानन कांबळे श्रीकांत मोहिते सहसचिव नवनाथ आरसड नवनाथ मोहिते कोषाध्यक्ष युवराज कांबळे संतोष घाटूळ सह कोषाध्यक्ष नितीन मोहिते नितीन वाणी संघटक मच्छिंद्र कांबळे किशोर मोहिते सह संघटक कैलास मोहिते सचिन साळवे कार्याध्यक्ष विजय मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे

## माळीवाडा येथे वाकीच्या दिंडीचे जोरदार स्वागत




**दौलताबाद :** श्री क्षेत्र शिवेश्वर महाराज पालखी पायी दिंडी सोहळा श्री क्षेत्र वाकी ता. कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील नारायण देव बाबा याची पायी दिंडी पढरपुर कडे प्रस्थान झाली आहे दि 10 शुक्रवारी श्री क्षेत्र देवगिरी च्या पायथ्याशी असलेल्या माळीवाडा गावात दिडी चे भव्य स्वागत करण्यात आले यावेळी माळीवाडा गावातील येशीत रागोळी काढून दिडीचे वाजत गाजत गावातुन मिरवणूक काढून महिलानी दिडी पुढे महिलानी फुगाड्या खेळत टाळ मृदंग च्या गजरात एकनाथ नामदेव तुकाराम, ज्ञानोबा माऊली च्या जय घोषाणे माळीवाडाचा परिसर दुमदुमुला होता.श्री क्षेत्र वाकी (देवीची) येथील नारायण देव बाबा दिडीमध्ये 1000 ते1200 महिला पुराष वारकराची असुनयाची पायी दिंडी चे 25 वे वर्ष आसुन दरवर्षी प्रमाणे माळीवाडा येथे चंद्रकात मोहन हेकडे व परिवार हे 25 वर्षा पासुन या दिडेचे स्वागत व वारकऱ्यांची भोजन व्यवस्था करतात. यावेळी चंद्रकांत हेकडे व शोभा हेकडे यानी परिवारा सह दिंडीत असलेल्या आश्वा चे पुजन, रथ पुजन दिडी चालक शिवेश्वर देवस्थान चे उत्तराधिकारी ह.प.भ. नामदेव महाराज याचे पुजन व विजय पलोड महाराज यांचा सत्कार केला. प्रवचना नंतर वारकऱ्यांनी जेवन करून पुढील प्रवासाला निघाले यावेळी चंद्रकांत हेकडे, बाबासाहेब काळे शामराव महाराज आनिता हेकडे, कडू किर्तीकर,मंदाकिनी कीर्तिकर,संचिन हेकडे, असाराम हेकडे ,वैजिनाथ आढाव ,अनिता देवतकर, सुधाकर हेकडे ,वैजिनाथ हेकडे, शिवाजी मोरे, नामदेव देवतकर, बाळू हेकडे ,सुरेश हेकडे, बाळू हेकडे, नंदू जाधव, राजू हेकडे, संतोष हेकडे, शाम आढाव, चंदू गवळी, शामराव महाजन, रामलाला मोरे, नंदकुमार जाधव, रघविर शेवाळे महेश शिदे,सतिष हेकडे, सुरेश हेकडे वैजिनाथ हेकडे सचिन हेकडे, कैलास आदी उपस्थित होते या सह परिसरातील महिलाची व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंमली पदार्थांना ब्रेक, संभाजीनगर जिल्हा पोलीसांकडून नऊ क्विंटल गांजा नष्ट



**कन्नड (अरुण थोरात) :** अंमली पदार्थाविरोधात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांची कारवाई; गुन्ह्यांतील तब्बल ९०६.६३ किलो गांजा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आला आहे.अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला प्रभावी आळा घालण्यासाठी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाकडून सातत्याने कठोर कारवाई करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत (NDPS Act) दाखल गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला तब्बल ९०६.६३ किलो गांजा हा अंमली पदार्थ सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यात आला आहे.सन २०२३ ते २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांत अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये दाखल झालेल्या गुन्ह्यांमधील गांज्याची झाडे तसेच सुका गांजा असा एकूण ९०६.६३ किलो अंमली पदार्थांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. सदर मुद्देमाल पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथील अंमली पदार्थांच्या मध्यवर्ती गोडाऊनमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला होता.मा. प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अंमली पदार्थ नाश समितीने या सर्व मुद्देमालाचा सविस्तर आढावा घेतला. जप्त करण्यात आलेला गांजा नष्ट करण्यापूर्वी आवश्यक रासायनिक विश्लेषण (सी.ए.) अहवाल, संबंधित मा. न्यायालयाची परवानगी तसेच इतर सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश मा. पोलीस अधीक्षक यांनी दिले होते. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली.यानंतर अंमली पदार्थ नाश समितीचे सदस्य प्रशांत स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, संजय सहाणे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक, समितीचे नोडल अधिकारी विजयसिंग राजपूत, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, तसेच संतोष रानडे (सहाय्यक रासायनिक विश्लेषक) आणि धनेश इंगळे (वैज्ञानिक सहाय्यक), प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर यांच्या उपस्थितीत व देखरेखीखाली संपूर्ण कायदेशीर कार्यवाही पार पाडण्यात आली.त्यानुसार दि. ०८ जुलै २०२६ रोजी हा संपूर्ण ९०६.६३ किलो गांजा नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र एन्व्हीरो पॉवर लिमिटेड, एमआयडीसी, रांजणगाव, ता. शिरूर, जि. पुणे येथे सुरक्षितरित्या पाठविण्यात आला आणि पर्यावरणीय तसेच कायदेशीर निकषांचे पालन करून त्याचा अंतिम नाश करण्यात आला.सदर कारवाईमध्ये वैजापूर, करमाड, पिशोर, शिवूर, फुलंब्री, सिल्लोड ग्रामीण आणि बिडकीन या पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांतील जप्त अंमली पदार्थांचा समावेश होता. अंमली पदार्थाविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी आणि जप्त केलेल्या मुद्देमालाची पारदर्शक व कायदेशीर विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी केलेली ही कारवाई अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. अंमली पदार्थांच्या अवैध साखळीला खिळ बसविणे आणि समाजाला व्यसनमुक्त व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, हा या कारवाईमागील प्रमुख उद्देश असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.ही संपूर्ण कारवाई प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक व प्रशांत स्वामी, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली संजय सहाणे, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), विजयसिंग राजपूत, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अंमलदार संगीता वासडीकर, रवी लोखंडे, सचिन सोनार, प्रिया भंडारे आणि सरला जाधव यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## बारवाले महाविद्यालयात 'संवादी' वार्षिकांकाचे उत्साहात विमोचन; विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला उत्तम व्यासपीठ




**जालना :** स्थानिक बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या 'संवादी' या वार्षिक अंकाचे नुकतेच दिमाखात विमोचन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्या शुभहस्ते हा विमोचन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी अंकाचे कार्यकारी संपादक प्रा. डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड यांनी 'संवादी'च्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "या अंकात लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी साहित्यसौंदर्याचा आस्वाद घेतानाच सामाजिकतेचे भानही उत्तम रीतीने जपले आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त सर्जनशीलतेला आणि लेखन कौशल्याला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासोबतच, त्यांच्यात सामाजिक मूल्यांची रुजवणूक करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य हा वार्षिक अंक सातत्याने करत आहे."या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने कार्यकारी संपादक प्रा. संदीप पाटील, प्रा. मंगल मुळे, डॉ. कालिदास सूर्यवंशी, डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. प्रवीण कोकणे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. विलास भुतेकर, डॉ. बळीराम कटारे, डॉ. रवींद्र भोरे, डॉ. कल्याण कुंभार, डॉ. स्वाती पुरी, प्रा. राजक्रांती वलसे आणि डॉ. निलेश बर्डे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जुलै २०२६


## मतदार पुनरनिरीक्षण कामाची जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी



**कन्नड (अरुण थोरात) :** मतदार पुनरनिरीक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी कन्नड तालुक्यातील अंधानेर, मुंडवाडी, चापानेर, औराळा आदी गावांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. या दौऱ्यादरम्यान त्यांनी बी.एल.ओ. आणि पर्यवेक्षकांकडून कामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच हे काम विहित मुदतीत व अचूकतेने पूर्ण करण्यासंदर्भात योग्य सूचना देऊन उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार सारिका भगत, गटविकास अधिकारी रामावत, पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप, गटशिक्षणाधिकारी सबाहत मॅडम, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी अंधानेर येथील प्रशालेला भेट दिली. यावेळी त्यांच्या हस्ते प्रशालेच्या भव्य पटांगणात वृक्षारोपण करण्यात आले. प्रशालेच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'डेन फॉरेस्ट'ची (घनदाट जंगल) त्यांनी विशेष पाहणी केली. निसर्गरम्य 'ऑक्सिजन हब' पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी व्यवस्थापनाचे आणि शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. तसेच शाळेचा परिसर, राबवले जाणारे विविध नावीन्यपूर्ण उपक्रम आणि एकूणच शालेय कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय केवट यांनी केले. याप्रसंगी अंधानेरचे सरपंच अशोकराव दाबके यांच्यासह, मंडळ अधिकारी विकास वाघ, अप्पासाहेब सोनवणे, तलाठी श्री. कंचार, ग्रामविस्तार अधिकारी मोरस्कर, प्रशालेचे नारायण दांगट, संजय केवट, रघुनाथ पाटील, दीपक सोनवणे, रामभाऊ गुढेकर, सुयश अहिरराव, मच्छिन्द्र डिगोडे, मीनाक्षी बडग, आरती बागुल, अष्पाक शेख यांच्यासह ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार मंडळ अधिकारी विकास वाघ यांनी मानले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## कोळवाडी ते सोमा ठाकरवाडी रस्त्याची दुरवस्था



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील आदिवासी वाडी असलेल्या कोळवाडी ते सोमा ठाकरवाडी हा रस्ता अत्यंत खराब झाल्यांने ग्रामस्थ, विद्यार्थ्यांचे हालबेहाल होत आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल व खड्डे निर्माण झाल्याने नागरिकांना ये-जा करणे अत्यंत कठीण झाले आहे. या रस्त्यावरून दररोज प्रवास करणाऱ्या आदिवासी ठाकर समाजातील अबाव वृद्ध, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सोमा ठाकूरवाडी येथे अंगणवाडी तसेच जि.प.प्रा. शाळा असून शिक्षक व लहान बालके, विद्यार्थ्यांना दररोज जीव धोक्यात घालून या रस्त्याने प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी हा रस्ता चिखलमय झाल्याने वाहनांचीही मोठी अडचण होत आहे. परिणामी रात्री अपरात्री रुग्णांचा जीव धोक्यात घालून न्यावे लागत आहे. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन कोळवाडी ते सोमा ठाकूरवाडी रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला असल्याची माहिती शशिकांत गोविंद नागरे यांनी दिली.

## देवगिरीत जेईई, एमएचटी-सीईटी व बारावी बोर्ड परीक्षेत प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंताचा सत्कार सोहळा संपन्न...

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील JEE, MHT-CET व १२ वी बोर्ड परीक्षेत कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ.सतीश चव्हाण यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे प्रतिपादन केले विद्यार्थ्यांनो काळाचे आव्हान ओळखून मार्गक्रमण करा, देवगिरीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान असून या विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि सातत्य ठेवून मिळवलेले हे यश प्रेरणादायी असेच आहे. देवगिरी महाविद्यालयांने सातत्याने ग्रामीण विद्यार्थी केंद्रबिंदू मानून त्यांना सकस आणि पोषक वातावरण निर्माण करून देण्यासाठी अग्रक्रमाने विचार केला असून विद्यार्थी स्वतःच्या पायावर कसा उभा राहील हा दृष्टिकोन ठेवूनच संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवरील देवगिरीचे अनेक माजी विद्यार्थी विविध विभागात कार्यरत असून ही महाविद्यालयाच्या दृष्टीने अभिमानाची बाब असल्याचे सांगून देवगिरी महाविद्यालय हे नेहमीच मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने जे जगामध्ये उत्तम कोर्सेस आहे ते सर्व कोर्सेस महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.देवगिरी महाविद्यालयाचा जेईई नीट सेलचे विद्यार्थी JEE Mains मध्ये अनुक्रमे सार्थक नाईक ९९.८९ %ile प्रथमेश दैठणकर ९९.७३%ile , वेदिका गोपाळे ९९.६३ %ile गुण मिळवले आहे.तर PCM ग्रुपमध्ये सर्वेश भोसले ९९.९१%ile , इशांत गवळी ९९.७६%ile अथर्व गिरी ९९.७५ %ile, PCB ग्रुपमध्ये कृष्णाली दहातोंडे, ९९.६०%ile मोनाली पाध्ये ९९.०७%ile संयुक्त गोस्वामी ९८.०७%ile गुण संपादन केले. तर बारावी बोर्ड परीक्षेत कला शाखेत अनुक्रमे दत्तू जाधव ९२.७१% सुहानी शिंदे ९२% युक्ता देशपांडे ९१.८३% ,वाणिज्य शाखेत स्वरा देशमुख,९७.६७% युग श्रॉफ ९७.३३% प्रीती मुळे ९७% तर विज्ञान शाखेत वेदिका गोपाळे ९३.३३% ग्रीष्मा चव्हाण ९०.१७% ईशा जमालपुरे ८९.६७% गुण प्राप्त केले. वेदिका गोपाळे व सार्थक नाईक यांचा आयआयटी कानपूर येथे जेईई ॲडव्हान्स मधून प्रवेश निश्चित झाला आहे. JEE ,MHT-CET व बारावी बोर्ड परीक्षेत परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश मिळवलेल्या विद्यार्थी व पालकांचा सत्कार दि.१० जुलै २०२६ रोजी देवगिरी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रवी पाटील होते तरउपप्राचार्य प्रा. अरुण काटे उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे उपप्राचार्य प्रा.विजय नलावडे जेईई- नीट सेल संचालक प्रा. नंदकिशोर गायकवाड यांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाच्या JEE, NEET सेलचे विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. महाविद्यालयाचे JEE, NEET सेलचे हे चौथे वर्ष असून विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय सेलच्या नियमित तासिका, महाविद्यालयाने केलेलं अचूक नियोजन, महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या टेस्ट सिरीज व संस्थेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना दिलेल्या सुविधा याच्या एकत्रित प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी यश मिळाल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी केले. कला व वाणिज्य विभागाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे अहवाल वाचन उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरे यांनी केले. याप्रसंगी वेदिका गोपाळे, स्वरा देशमुख ,सृष्टी कौशल आणि पालक प्रतिनिधी म्हणून रवींद्र गोरे यांनी मनोगत व्यक्त केले.महाविद्यालयाचे CET मध्ये २९ JEE Mains मध्ये १२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहे. सूत्रसंचालन व आभार डॉ.शिवानंद भानुसे यांनी मानले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जुलै २०२६

# लोकसंख्या : विकासाचा पाया की आव्हान - डॉ. राजेंद्र बगाटे

दरवर्षी ११ जुलै हा दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वाढत्या लोकसंख्येची आकडेवारी मांडण्यात नसून, लोकसंख्या आणि शाश्वत विकास यांच्यातील परस्परसंबंध समजून घेण्यात आहे. १९८७ साली जगाची लोकसंख्या पाच अब्जांचा टप्पा ओलांडल्यानंतर लोकसंख्या वाढीचे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक परिणाम लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने १९८९ मध्ये ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून घोषित केला. आज जगाची लोकसंख्या आठ अब्जांहून अधिक झाली असून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. ही बाब एकाच वेळी अभिमानाची, संधीची आणि चिंतनाची आहे. कारण लोकसंख्या ही राष्ट्राची सर्वात मोठी मानवी संपत्ती असली, तरी तिचे योग्य नियोजन आणि गुणवत्तापूर्ण विकास न झाल्यास ती अनेक समस्यांचे मूळ ठरू शकते.लोकसंख्या म्हणजे केवळ एखाद्या देशात राहणाऱ्या लोकांची संख्या नव्हे. ती त्या राष्ट्राची कार्यशक्ती, उत्पादनक्षमता, सांस्कृतिक वैविध्य, ज्ञानसंपदा आणि सामाजिक प्रगतीचे प्रतीक असते. प्रत्येक राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. निरोगी, सुशिक्षित, कुशल, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेली आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार लोकसंख्या देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकते. परंतु शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवेतील असमानता, बेरोजगारी, गरिबी, संसाधनांची कमतरता आणि सामाजिक विषमता यामुळे वाढती लोकसंख्या विकास प्रक्रियेसाठी गंभीर आव्हान ठरू शकते. त्यामुळे आज लोकसंख्या नियंत्रण हा शब्द मागे पडून लोकसंख्या व्यवस्थापन, लोकसंख्येची गुणवत्ता आणि मानवी विकास या संकल्पनांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.भारतातील लोकसंख्येचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्यानंतर आरोग्यसेवा, लसीकरण, औषधोपचार, अन्नधान्य उत्पादन आणि स्वच्छता यामध्ये मोठी सुधारणा झाली. यामुळे मृत्युदर झपाट्याने कमी झाला; परंतु काही दशकांपर्यंत जन्मदर तुलनेने जास्त राहिल्याने लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. कालांतराने शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, शहरीकरण, आरोग्य सुविधांचा विस्तार आणि कुटुंब नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक राज्यांमध्ये प्रजनन दरात घट झाली आहे. तथापि, भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या देशात लोकसंख्या विषयक चित्र सर्वत्र सारखे नाही. काही राज्यांमध्ये लोकसंख्या स्थिरतेकडे वाटचाल होत असताना काही भागांमध्ये अजूनही तुलनेने जास्त प्रजनन दर दिसून येतो. त्यामुळे लोकसंख्या धोरण तयार करताना प्रादेशिक गरजा लक्षात घेणे आवश्यक ठरते.लोकसंख्या वाढीचा सर्वाधिक परिणाम नैसर्गिक संसाधनांवर होतो. जमीन, पाणी, जंगल, ऊर्जा, अन्नधान्य आणि खनिज संपत्ती ही संसाधने मर्यादित आहेत. लोकसंख्या वाढत गेली की या संसाधनांवरील ताणही वाढतो. शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र कमी होत जाते, भूजलाची पातळी खालावते, जंगलतोड वाढते, जैवविविधतेचा ऱ्हास होतो आणि पर्यावरणीय समतोल बिघडतो. हवामान बदलाच्या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर वाढती लोकसंख्या आणि संसाधनांचा अनियंत्रित वापर ही चिंतेची बाब ठरत आहे. म्हणूनच शाश्वत विकासाचा विचार करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला केंद्रस्थानी ठेवणे अत्यावश्यक आहे.शहरीकरण हा वाढत्या लोकसंख्येचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक जीवनशैलीच्या शोधात लाखो लोक ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी महानगरांमध्ये लोकसंख्येची प्रचंड गर्दी होते. निवासस्थानांची कमतरता, झोपडपट्ट्यांचा विस्तार, वाहतूक कोंडी, जल, वायू व ध्वनी प्रदूषण, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापनाच्या समस्या आणि सार्वजनिक आरोग्यावरील वाढता ताण ही वाढत्या शहरी लोकसंख्येची प्रमुख आव्हाने आहेत. यावर उपाय म्हणून नियोजनबद्ध शहरी विकास, उपग्रह शहरांची निर्मिती, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पायाभूत सुविधांचा समतोल विस्तार आवश्यक आहे.लोकसंख्या आणि आरोग्य यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. माता व बाल आरोग्य, पोषण, सुरक्षित प्रसूती, बालमृत्यू कमी करणे, किशोरवयीन आरोग्य, लसीकरण, प्रजनन आरोग्य आणि कुटुंब नियोजन या सर्व बाबी लोकसंख्या व्यवस्थापनाशी संबंधित आहेत. निरोगी माता आणि निरोगी बालक हे निरोगी समाजाचे आधारस्तंभ असतात. प्रत्येक दांपत्याला कुटुंबाचा आकार ठरविण्याचा अधिकार आहे. त्यासाठी त्यांना अचूक माहिती, समुपदेशन, आधुनिक गर्भनिरोधक साधने आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. कुटुंब नियोजन म्हणजे लोकसंख्या कमी करण्याचा कार्यक्रम नसून आरोग्यदायी, आनंदी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंब घडविण्याचा प्रयत्न आहे.महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण हे लोकसंख्या स्थिरतेचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जेव्हा मुलींना उच्च शिक्षण, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक सुरक्षितता मिळते, तेव्हा विवाहाचे वय वाढते, मातृत्वाचे नियोजन होते, कुटुंब नियोजनाचा स्वीकार वाढतो आणि संपूर्ण कुटुंबाचे जीवनमान उंचावते. शिक्षित महिला आपल्या मुलांच्या आरोग्य, शिक्षण आणि पोषणाबाबत अधिक सजग असतात. म्हणूनच 'एक मुलगी शिकली तर दोन कुटुंबे घडतात' हे विधान लोकसंख्या व्यवस्थापनाच्या संदर्भातही तितकेच महत्त्वाचे ठरते.भारतासमोर आज सर्वात मोठी संधी म्हणजे त्याची युवा लोकसंख्या होय. देशातील मोठा वर्ग हा कार्यक्षम वयोगटात आहे. यालाच 'लोकसंख्यात्मक लाभांश' असे म्हटले जाते. जर या युवकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक कौशल्ये, डिजिटल साक्षरता, रोजगार, उद्योजकतेसाठी प्रोत्साहन आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, तर भारत जगातील सर्वात शक्तिशाली अर्थव्यवस्थांपैकी एक बनू शकतो. परंतु याच युवकांना रोजगार मिळाला नाही, कौशल्यांचा अभाव राहिला आणि विकास प्रक्रियेत सहभाग मिळाला नाही, तर बेरोजगारी, असंतोष, गुन्हेगारी आणि सामाजिक अस्थिरता वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.रोजगार आणि लोकसंख्या यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येसाठी वाढत्या रोजगार संधी निर्माण करणे आवश्यक असते. आजच्या काळात केवळ पारंपरिक नोकऱ्यांवर अवलंबून राहणे शक्य नाही. कृषी प्रक्रिया उद्योग, पर्यटन, सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, जैवतंत्रज्ञान, ई-कॉमर्स, स्टार्टअप्स आणि स्वयंरोजगार या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. शिक्षण व्यवस्थेनेही रोजगारक्षम कौशल्यांवर भर दिला पाहिजे.लोकसंख्या वाढीचा परिणाम शिक्षण व्यवस्थेवरही होतो. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शाळा, महाविद्यालये, शिक्षक, प्रयोगशाळा, वाचनालये आणि डिजिटल सुविधा यांचीही वाढ आवश्यक ठरते. दर्जेदार शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले नाही तर सामाजिक विषमता वाढते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि कौशल्याधारित शिक्षणावर दिलेला भर हा लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा संबंध आज अधिक गंभीर झाला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलांची तोड, प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, पाण्याचा अतिवापर आणि जैवविविधतेचे नुकसान वाढत आहे. हवामान बदलामुळे पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक जीवनशैली, जलसंवर्धन, ऊर्जा बचत, वृक्षारोपण आणि कचरा व्यवस्थापन या बाबींमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे. लोकसंख्येचे व्यवस्थापन आणि पर्यावरण संरक्षण ही एकमेकांना पूरक अशीच प्रक्रिया आहे.जागतिक लोकसंख्या दिनाचा आणखी एक महत्त्वाचा संदेश म्हणजे लिंगभाव समानता होय. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करणे, बालविवाह रोखणे, महिलांना समान संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. महिलांच्या निर्णयक्षमतेचा आदर करणारा समाजच लोकसंख्या व्यवस्थापनात यशस्वी ठरतो.भारतातील कुटुंब नियोजन कार्यक्रमाला सात दशकांहून अधिक इतिहास आहे. भारत हा अधिकृत राष्ट्रीय कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू करणारा जगातील पहिला देश मानला जातो. कालानुरूप या कार्यक्रमात मोठे बदल झाले. आज हा कार्यक्रम सक्तीऐवजी स्वेच्छा, माहितीपूर्ण निवड, आरोग्य हक्क आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांवर आधारित आहे. आशा सेविका, अंगणवाडी कर्मचारी, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि विविध आरोग्य मोहिमांद्वारे ग्रामीण आणि दुर्गम भागातही जनजागृती करण्यात येत आहे. तरीही काही ठिकाणी अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक रूढी आणि अपुऱ्या सुविधा यांमुळे अपेक्षित प्रगती झालेली नाही. त्यामुळे लोकजागृती आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा या दोन्ही गोष्टींना समान महत्त्व देणे आवश्यक आहे.लोकसंख्या विषयक धोरण आखताना वृद्ध लोकसंख्येचाही विचार करावा लागतो. आयुर्मान वाढल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. त्यांच्यासाठी आरोग्य सेवा, सामाजिक सुरक्षा, निवृत्ती वेतन, मानसिक आरोग्य, वृद्धाश्रमांऐवजी समुदायाधारित सेवा आणि सन्मानपूर्वक जीवन यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. एका बाजूला युवा लोकसंख्या आणि दुसऱ्या बाजूला वाढती वृद्ध लोकसंख्या या दोन्ही घटकांचा समतोल साधणे हे आधुनिक लोकसंख्या धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.तंत्रज्ञानामुळे लोकसंख्या व्यवस्थापन अधिक परिणामकारक झाले आहे. डिजिटल आरोग्य नोंदी, कृत्रिम बुद्धिमत्ता, भौगोलिक माहिती प्रणाली, मोबाईल आरोग्य सेवा, टेलिमेडिसिन आणि डेटा विश्लेषण यांच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविता येतात. जनगणना, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण आणि विविध लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास यांच्या आधारे शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे सुलभ होते. अचूक आकडेवारीशिवाय प्रभावी नियोजन शक्य नसते.लोकसंख्या व्यवस्थापनामध्ये स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने योग्य माहितीचा प्रसार होऊ शकतो. लोकसंख्येविषयक अनेक गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी माध्यमांनी सकारात्मक भूमिका बजावणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये लोकसंख्या शिक्षण, आरोग्य शिक्षण आणि जीवनकौशल्य शिक्षण यांचा समावेश केल्यास भावी पिढी अधिक जबाबदार नागरिक म्हणून घडू शकते.जागतिक लोकसंख्या दिन हा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो की, लोकसंख्या ही समस्या नाही; तर तिचे अयोग्य नियोजन ही समस्या आहे. जर प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार शिक्षण, आरोग्य सेवा, पोषण, स्वच्छता, सुरक्षित निवास, रोजगार आणि समान संधी उपलब्ध झाल्या, तर मोठी लोकसंख्या हे राष्ट्राचे सर्वात मोठे सामर्थ्य ठरते. आज जगातील अनेक विकसित देशांना कामगारांची कमतरता भासत आहे, तर भारताकडे प्रचंड युवा मनुष्यबळ उपलब्ध आहे. त्यामुळे या मानवी संपत्तीचे ज्ञान, कौशल्य आणि नवोपक्रमामध्ये रूपांतर करणे ही काळाची गरज आहे.आजच्या डिजिटल आणि जागतिकीकरणाच्या युगात लोकसंख्येचा प्रश्न केवळ एका देशापुरता मर्यादित राहिलेला नाही. हवामान बदल, अन्नसुरक्षा, पाणी, स्थलांतर, आरोग्य आणि आर्थिक विकास या सर्व बाबींवर लोकसंख्येचा प्रभाव पडतो. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता करताना लोकसंख्या व्यवस्थापनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. गरिबी निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, चांगले आरोग्य, लिंगभाव समानता, स्वच्छ पाणी, सन्मानजनक रोजगार आणि पर्यावरण संरक्षण ही सर्व उद्दिष्टे लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासाशी जोडलेली आहेत.भारतातील प्रत्येक नागरिकाने छोट्या आणि सुजाण कुटुंबाची संकल्पना स्वीकारणे, महिलांचा सन्मान करणे, मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, संसाधनांचा काटकसरीने वापर करणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. लोकसंख्या विषयक प्रश्न केवळ शासन सोडवू शकत नाही; त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. जनजागृती, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातूनच लोकसंख्या आणि विकास यांच्यातील संतुलन साधता येईल.शेवटी, जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ दिनविशेष नसून मानवी विकासाचा, सामाजिक उत्तरदायित्वाचा आणि शाश्वत भविष्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. लोकसंख्येची संख्या वाढण्यापेक्षा तिची गुणवत्ता वाढणे अधिक महत्त्वाचे आहे. सुशिक्षित, निरोगी, कौशल्यसंपन्न, पर्यावरण-जागरूक आणि समान संधी मिळालेली लोकसंख्या हेच कोणत्याही राष्ट्राचे खरे सामर्थ्य असते. लोकसंख्या, पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक न्याय यांचा समतोल राखत विकासाची वाटचाल केली, तर भारत केवळ सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश राहणार नाही, तर सर्वाधिक सक्षम, समृद्ध आणि मानवी मूल्यांचा आदर करणारे राष्ट्र म्हणून जगासमोर आदर्श निर्माण करेल. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आपण सर्वांनी जबाबदार नागरिक म्हणून लोकसंख्येच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी हातभार लावण्याचा निर्धार केला, तरच विकसित, समृद्ध आणि शाश्वत भारताचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ११ जुलै २०२६


# मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय — भ्रष्ट अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व न्यायाधीशांविरुद्ध निर्णायक पाऊल

मनमानी आदेश पारीत करणाऱ्या तहसीलदार, जिल्हाधिकारी, प्रशासकीय अधिकारी,मंत्री व न्यायाधीशांना बडतर्फीची प्रक्रिया ठरवून वठणीवर आणणारा ऐतिहासिक निर्णयआता कायद्याच्या चौकटीबाहेर जाणारे न्यायिक व अर्धन्यायिक अधिकारी ,प्रशासकीय अधिकारी ठरणार बडतर्फ ,सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार ते उच्च न्यायिक अधिकारी व प्रशासकीय अधिकारी ते चेयर मन डायरेक्टर— सर्वांच्या मनमानी कारभारावर अंकुश; चुकीचे निर्णय देणाऱ्यांना बडतर्फ करण्याचा मार्ग मोकळा “इंडियन बार असोसिएशन”, “सर्वोच्च व उच्च न्यायालय पक्षकार संघटना”, तसेच “इंडियन लॉयर्स अँड ह्युमन राईट्स ॲक्टिव्हिस्ट्स असोसिएशन” (भारतीय वकील व मानवाधिकार कार्यकर्ते संघटना) यांच्या वतीने न्या. अमित बोरकर यांच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.सर्वभ्रष्ट अधिकारी , प्रशासकीय मनमानी करनारे, नियम रूल, कार्यालय न जुम्मानारे व न्यायाधीशांचे दलाल असलेल्या वरिष्ठ वकिलांना बसला जोरदार दणकासामान्य जनता आणि हक्कांसाठी लढणाऱ्या नवोदित वकिलांच्या हातात बळ देणारा महत्वाचा निर्णयMumbai :- मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाने तहसीलदार, जिल्हाधिकारी, मंत्री तसेच न्यायाधीश यांच्यासह न्यायिक आणि अर्धन्यायिक अधिकाऱ्यांच्या व प्रशासकीय अधिकारी याची मनमानी व बेकायदेशीर आदेशांवर कडक लगाम बसला आहे. हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, पुढील काळात संपूर्ण न्यायव्यवस्थेच्या कामकाजासाठी मार्गदर्शक ठरेल असा ठोस संदेश देतो.१. मनमानी आदेशावर अंकुशगेल्या अनेक दशकांपासून असे दिसून येत होते की काही न्यायिक व अर्धन्यायिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विशेषतः सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार व त्यांच्यासारखे निर्णय देणारे अधिकारी, कायद्याचा गैरवापर करून श्रीमंत व प्रभावशाली लोकांच्या दबावाखाली व वरिष्ठंच्या मर्जी करता आदेश पारित करीत. अशा आदेशांमध्ये कायदेशीर प्रक्रियेची पायमल्ली, तथ्यांचे दडपण आणि न्याय्य हक्कांचे उल्लंघन या गोष्टी स्पष्टपणे दिसून येत होत्या.आजच्या वास्तवाकडे पाहिले तर हे उघडपणे जाणवते की सामान्य नागरिकांचे , जानतेचे, गरीब लोकंचे आणि होतकरू वकिलांचे हक्क अनेकदा पायदळी तुडवले जातात. शासकीय अधिकारी,रजिस्ट्रार, प्रशासकीय अधिकारी, तहसीलदार, जिल्हाधिकारी ते अगदी काही न्यायाधीशसुद्धा — कायद्याचे अक्षरशः खेळणे करून श्रीमंत, प्रभावशाली व उच्च पदस्त अधिकारी, दलालांच्या बाजूने निर्णय देतात. शब्दांची कसरत, कायद्याची मोडतोड, नियम कायदा बाजूला सारुण आणि प्रक्रियेचा दुरुपयोग ही त्यांची नेहमीची पद्धत बनली आहे.अशा परिस्थितीत साधारण नागरिकाने , पीडित व्यक्तिंणे किंवा तरुण वकिलाने अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा ठरवला, तर त्याच्यासमोर मोठे आव्हान उभे राहते — वेळखाऊ खटले, प्रचंड खर्च आणि वरिष्ठांचा दबाव, सत्ताधाऱ्यांचा दबाव. प्रशासकीय अधिकारी यांचा मुजोरीपना या सर्वांमुळे न्याय मिळवणे म्हणजे अवघड नव्हे तर जवळजवळ अशक्य कार्य ठरते.याशिवाय, जो कोणी तरी धाडस करून आवाज उठवतो, त्याला गप्प करण्यासाठी भ्रष्ट अधिकारी, काही न्यायाधीश, त्यांचे दलाल वकील आणि सुपारीबाज वकिल संघटना मिळून मोहीम उघडतात. त्याच्यावर खोट्या तक्रारी, धमक्या, अपमान व खोटा केस करने, मानसिक त्रासाचे डोंगर लादले जातात. अशा वातावरणामुळे न्यायासाठी लढणाऱ्यांचे मनोधैर्य खचवण्याचा प्रयत्न केला जातो.मात्र, मुंबई उच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाने या सर्व दबावतंत्राला आणि खोट्या दाव्यांना जोरदार चपराक दिली आहे. या निर्णयाने स्पष्ट केले आहे की कायद्याचा गैरवापर करणाऱ्या , नियम, रूल , कायदयाचि पायामल्ली करनारे , मनमानी व नियमबाह्य आदेश पास करनारे व न्यायव्यवस्थेला कलंक लावणाऱ्या कोणालाही — तो रजिस्ट्रार असो, तहसीलदार, जिल्हाधिकारी , प्रशासकीय अधिकारी किंवा न्यायाधीश — कायद्याच्या जबाबदारीपासून सुटका मिळणार नाही.हा निर्णय केवळ कायद्याचा तांत्रिक विजय नाही, तर सत्यासाठी लढणाऱ्या सामान्य नागरिकांच्या , पीड़ितांच्या , अन्याय ग्रस्त लोकंच्या व होतकरू वकिलांच्या हातातले शस्त्र आहे. यामुळे आता अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, आणि दलाल व भ्रष्ट गटांचा खोटा दबाव कोसळून पडला आहे.नवीन निर्णयामुळे मात्र अशा अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन दिलेला आदेश हा केवळ आव्हानास पात्र नाही तर त्यावरून संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध थेट चौकशी, निलंबन, बडतर्फी व फौजदारी कारवाई देखील होऊ शकते. त्यामुळे न्यायिक व अर्धन्यायिक , प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी व बेजबाबदार वर्तनावर कठोर अंकुश बसणार आहे. २. भ्रष्ट अधिकारी व दलाल वकिलांना धक्काइंडियन बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. निलेश ओझा तसेच त्यांचे सहकारी ॲड. विवेक रामटेके, ॲड. इश्वरलाल अग्रवाल, ॲड. विजय कुरले, श्री. रशीद खान पठाण आणि यांसारख्या निडर वकिलांनी गेली दोन दशके न्याय व्यवस्थेतील भ्रष्ट प्रवृत्तींविरुद्ध सातत्याने व निर्भीडपणे लढा दिला आहे. या लढ्यामध्ये त्यांनी केवळ न्यायालयीन मार्गांचा वापर करून अनेक भ्रष्ट अधिकारी, न्यायाधीश व त्यांच्या दलालांची पोलखोल केली नाही, तर सर्वसामान्य नागरिकांमध्येही जागृती निर्माण केली.या वकिलांनी विविध निर्णयांचे सखोल विश्लेषण करून सामान्य जनतेसाठी सोप्या भाषेत पुस्तके व लेख प्रकाशित केले, कार्यशाळा व व्याख्याने घेतली, ज्यामुळे होतकरू वकील आणि न्याय मागणारे नागरिक सक्षम झाले. यामुळे न्याय मिळविण्याच्या प्रक्रियेत एकप्रकारची जनआंदोलनासारखी जाणीव रुजली.महत्त्वाचे म्हणजे, या वकिलांनी ‘भ्रष्ट न्यायाधीश अथवा अधिकारी यांच्यावर कारवाई होऊ शकत नाही’ हा खोटा समज व काही स्वार्थी वरिष्ठ वकिलांचा खोटा प्रचार पूर्णपणे खोटा ठरवला. त्यांनी प्रत्यक्ष उदाहरणे देत दाखवून दिले की कायद्याच्या चौकटीत राहून भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करणे, बडतर्फ करणे अथवा त्यांच्यावर फौजदारी कारवाई करणे शक्यच नाही तर अपरिहार्य आहे.या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. अमित बोरकर यांनी दिलेला ताज्या काळातील निर्णय हा भ्रष्ट अधिकारी, न्यायाधीश आणि त्यांचे संरक्षण करणारे दलाल वकील यांच्यासाठी धक्कादायक इशारा ठरला आहे. या निर्णयामुळे केवळ जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला नाही, तर प्रामाणिक व तरुण वकिलांसाठीही न्यायालयीन प्रणालीत काम करण्याचा आत्मविश्वास आणि प्रेरणा वाढली आहे.4. मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णयातील मुख्य मुद्देHarish Arora v. Registrar of Coop. Societies, 2025 SCC OnLine Bom 2833 या अत्यंत महत्त्वाच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट, कठोर आणि ठाम ऐतिहासिक भूमिका घेतली.न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणताही न्यायिक किंवा अर्धन्यायिक अधिकारी कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन, मनमानीने किंवा बाह्य दबावाखाली आदेश देतो, तर त्याचा तो आदेश केवळ चुकीचा नसून तो अधिकारी स्वतःच “Legal Malice” म्हणजेच न्यायिक बेइमानीचा दोषी ठरतो.न्यायाधीश किंवा अधिकारी हे केवळ पदाधिकारी नसून न्यायदानाचे विश्वस्त आहेत. ते जेव्हा जाणूनबुजून चुकीचा आदेश देतात तेव्हा तो केवळ शिस्तभंग मानला जात नाही, तर कायद्याच्या दृष्टीने हा एक गंभीर व दंडनीय अपराध ठरतो.यासोबतच सर्वोच्च न्यायालयाचा Union of India v. K.K. Dhawan, (1993) 2 SCC 56 हा ऐतिहासिक निर्णयदेखील येथे लागू होतो. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने ठामपणे स्पष्ट केले आहे की, न्यायाधीश अथवा अर्धन्यायिक अधिकारी जर जाणूनबुजून चुकीचे आदेश देतो, तर त्याच्यावर विभागीय चौकशी होऊन निलंबन, पदच्युती किंवा बडतर्फीची कारवाई करणे हे अपरिहार्य आहे.या तत्वामुळे न्यायाधीश वा अर्धन्यायिक अधिकाऱ्यांना अभेद्य कवच मिळते हा जो गैरसमज वर्षानुवर्षे पसरवण्यात आला होता, तो पूर्णपणे फोल ठरतो. उलट, या निर्णयामुळे स्पष्ट होते की न्यायाधीश असो वा अधिकारी — कोणालाही कायद्यापेक्षा वरचे स्थान नाही, आणि कायद्याचे उल्लंघन केल्यास त्याला कठोर जबाबदारीला सामोरे जावेच लागेल.काही तथाकथित वरिष्ठ वकिलांनी (उदा. ॲड. मिलिंद साठे व ॲड. नितीन ठक्कर) न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार झाकण्यासाठी तसेच स्वतःच्या स्वार्थी गटांचे रक्षण करण्यासाठी वर्षानुवर्षे खोटा प्रचार केला होता. त्यांनी असा दावा केला की भ्रष्टाचार करणाऱ्या किंवा अन्याय करणाऱ्या न्यायाधीशांविरुद्ध कोणतीही कारवाई करता येत नाही; उलट, जर कोणी कारवाईची मागणी केली तर त्या वकिलांविरुद्धच तक्रार दाखल करावी. ही भूमिका केवळ कायद्याच्या विरोधातच नव्हे तर संपूर्ण वकिली व्यवसायाच्या प्रतिष्ठेलाही कलंक लावणारी होती.या चापलूस मंडळींनी आपल्या खोट्या प्रचाराला कायदेशीर रंग देण्यासाठी बोगस व बेकायदेशीर ठराव पारित करून दोन वेळा सर्वोच्च न्यायालयाच्या मा. सरन्यायाधीशांकडे लेखी तक्रारी पाठवल्या. बॉम्बे बार असोसिएशनतर्फे सादर केलेल्या या ठरावांत असा मजकूर होता की —“एखाद्या न्यायिक अधिकाऱ्याने भ्रष्टाचार केला, बेकायदेशीर आदेश पारित करून अन्याय केला, वकिलांचा अपमान केला, अथवा वकिलांना बेकायदेशीर कोठडीत टाकले, तरीसुद्धा त्या भ्रष्ट व गुन्हेगार न्यायाधीशाविरुद्ध कोणतीही कारवाई करता येणार नाही; उलट, कारवाईचा आग्रह करणारे ॲड. विजय कुरले व इतर वकिलांविरुद्ध कारवाई करण्यात यावी.”मा. सरन्यायाधीशांनी अशा बोगस दाव्यांना व विनंत्यांना दोन वेळा फेटाळून लावत ॲड. मिलिंद साठे व ॲड. नितीन ठक्कर यांना व त्यांच्या गुलामगिरी मानसिकतेच्या लॉबीला कठोर चपराक दिली. मा. सरन्यायाधीशांनी ॲड. मिलिंद साठे व ॲड. नितीन ठक्कर यांच्यासारख्या दलाल वकिलांना कठोर झटका दिला. त्यामुळे केवळ त्यांच्या खोट्या दाव्यांचा भंडाफोड झाला नाही, तर त्यांच्या भोवती तयार करण्यात आलेल्या चापलूस लॉबीच्या गुलामगिरीच्या मानसिकतेलाही मोठा धक्का बसला आहे आणि त्यांचे पितळ उघडे पडले आहे.परिणामी बॉम्बे बार असोसिएशनची प्रचंड नाचक्की झाली असून त्यांच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकेकाळी वकिली व्यवसायातील अग्रगण्य स्थानाचा दावा करणाऱ्या या संघटनेवर आता ‘भ्रष्ट व अन्याय करणाऱ्या न्यायाधीशांचे संरक्षण करणारी संस्था’ असा ठपका बसला आहे.अशा परिस्थितीत हा निर्णय केवळ भ्रष्ट दलाल वकिलांसाठी धक्कादायक ठरलेला नाही, तर संपूर्ण वकिली समाजाला जबाबदारीची जाणीव करून देणारा ऐतिहासिक धडा ठरतो.”**आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नव्या निर्णयामुळे इंडियन बार असोसिएशनच्या लढाऊ कार्यपद्धतीवर शिक्कामोर्तब झाले असून, भ्रष्ट अधिकारी व दलाल वकिलांचे पितळ पुन्हा एकदा उघडे पडले आहे.

**आपला अधिकार मानवाधिकार**